महाराष्ट्र शासन

# समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

दूरध्वनी क्र.२०-२६१२७५६९ ईमेल - sakalyangovthostel@gmail.com

क्र.सकआ/शिक्षण/शावगृ/वसतिगृह प्रवेश/ दिनांक: ०६.०६.२०२५
२०२५-२६/का-५अ/ १६८८

वसतिगृह प्रवेश/महत्वाचे/सुधारीत

प्रति,

१) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)

२) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)

विषय: शासकीय वसतिगृहाचे सन २०२५-२६ चे प्रवेशाबाबत...

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचे शालेय वर्गाच्या परिक्षेचा त्याचप्रमाणे इयत्ता १० वी व १२ वी चा निकाल जाहिर झालेला आहे. शैक्षणिक संस्था स्तरावर विद्यार्थ्यांच्या सन २०२५-२६ या वर्षाकरीता प्रवेशाबाबतची कार्यवाही सुरू झालेली आहे. दिनांक १५ जुन २०२५ रोजीपासून शाळा, विद्यालये व महाविद्यालये सुरु होणार आहेत.

त्याअनुषंगाने शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियाबाबत खालीलप्रमाणे सूचना या परिपत्रकाव्दारे निर्गमित करण्यात येत आहेत. त्याचे तंतोतंत पालन सर्व संबंधितांनी करावे व वसतिगृह प्रवेशाबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी व समस्या निर्माण होणार नाहीत याची गांभीर्याने दखल घेण्यात यावी.

१. सर्व शासकीय वसतिगृहातील सर्व अभ्यासक्रमांचे विद्यार्थ्यांचे प्रवेश सन २०२५-२६ या वर्षासाठी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारावेत. ११ जून २०२५ पासून २०२५ - २०२६ ची ऑन लाईन वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू होइल.
२. सर्व प्रवेश प्रक्रिया शासकीय वसतिगृहनिहाय करावी. अंतिम निवड यादीस प्रचलित नियमानुसार संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी मान्यता प्रदान करावी. प्रचलित नियमानुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.
३. दि. १६ मे १९८४ व त्यानंतर वेळोवेळी आतापर्यंत निर्गमित झालेल्या प्रचलित शासन निर्णयाच्या अधिन राहून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.
४. वसतिगृह प्रवेशाबाबत स्वतंत्र आदेश काढून कर्मचाऱ्यांवर जबाबदारी सोपवावी.
५. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व गृहपाल यांनी वृतपत्रामध्ये बातमी आणि जाहिरात देवून याबाबतची प्रसिध्दी दयावी.
६. जे विद्यार्थी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती विचारण्यासाठी जिल्हा कार्यालयात किंवा वसतिगृहात येतील, त्यावेळी अशा विद्यार्थ्यांचे संपुर्ण नाव, मोबाईल क्रमांक, अभ्यासक्रम आणि ते प्रवेश घेऊ इच्छित असलेल्या शैक्षणिक संस्थेचे नाव याप्रमाणे माहिती घेऊन एका स्वतंत्र रजिस्टरमध्ये नोंद करावी. ज्यावेळी ऑनलाईन पोर्टलवर प्रवेश प्रक्रिया सुरू होईल त्यावेळी या विद्यार्थ्यांना दिलेल्या मोबाईल क्रमांकावर फोन करून ऑनलाईन अर्ज भरण्यास सांगण्यात यावे.

७. सदर प्रवेशासाठी पूर्वीप्रमाणेच प्रत्येक सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालये व शासकीय वसतिगृहामधून सन २०२५-२६ या वर्षाची वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असल्याची सूचना प्रसिध्द करावी.

८. प्रवेश प्रक्रिया सुरळीत व व्यवस्थित होणेसाठी सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी गृहपालांची बैठक घेवून त्यांना सविस्तर सूचना निर्गमित कराव्यात.

९. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याच्या बँकेचे खाते क्रमांक, आधार क्रमांक, बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न करुन घेण्याची जबाबदारी गृहपालांची असेल. या बाबींकडे विशेष लक्ष द्यावे.

त्याचप्रमाणे सन २०२४-२५ या वर्षात सुरुवातीला शालेय अभ्यासक्रम आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे वसतिगृह प्रवेश ऑफलाईनव्दारे करण्यात आलेले होते. नंतर शालेय अभ्यासक्रम आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे जे प्रवेश ऑफलाईन करण्यात आले होते त्यांना वर्षअखेरीपर्यंत ऑनलाईन प्रक्रियेमध्ये सामावून घेण्याबाबत प्रक्रीया राबविण्यात आली होती. सद्यस्थितीत सन २०२४-२५ या वर्षापर्यंतचे वसतिगृहातील सर्व प्रवेशितांचे तांत्रिक कारणामुळे अद्यापही समावेशन ऑनलाईन प्रक्रियेमध्ये झालेले नाही, ही प्रक्रिया अद्यापही सुरु आहे. पुढील ऑनलाईन प्रक्रियेअंतर्गत वसतिगृह प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे निर्वाह भत्ता व इतर रक्कम ही ऑनलाईन प्रक्रीयेव्दारे वितरीत करण्यात येणार आहेत. तरी ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरलेला नाही व त्याचे समावेशन पोर्टलमध्ये झालेले नाही अशा विद्यार्थ्यांना लाभ देण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात. म्हणून वसतिगृह प्रवेशित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन पोर्टलवर रजिस्ट्रेशन करून फॉर्म भरण्याच्या स्वयंस्पष्ट सूचना विद्यार्थ्यांना द्याव्यात.

यासाठी प्रत्येक वसतिगृहाच्या गृहपाल यांना वसतिगृहामध्ये प्रवेशित असलेल्या सर्व (१) Secondary-शालेय अभ्यासक्रम, (२) Higher Secondary-इयत्ता ११ वी, १२ वी (३) Non Professional-बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम जसे बी. ए. / बी. कॉम / बी. एस. सी., पदविका / पदवी आणि पदवी नतंरचे पदव्युत्तर पदवी, पदवीका इत्यादी अभ्यासक्रम (व्यावसायीक अभ्यासक्रम वगळुन) (४) Professional-व्यावसायिक अभ्यासक्रम अशा वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय यादी (Excel Format) तयार करून ठेवावी. ही यादी खालीलप्रमाणे नमुन्यात दोन दिवसात तयार करून ठेवावी.

| Sr.No. | Aadhar Number | Applicant Name | Admission Year | Type of Course |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |

टिप: १) सुरुवातीस वरील फॉर्मेटची एक्सेल फाईल पोर्टलवर गृहपाल लॉगीन मधून डाऊनलोड करावी व त्यात अचूक माहिती इंग्रजीमध्ये भरावी.

२) रकाना क्रमांक **4** मधील प्रवेशाचे वर्ष उदा. **(2020-21)/ (2021-22)/ (2022-23)/ (2023-24)/ (2024-25)** आणि रकाना क्रमांक **5** मधील अभ्यासक्रमाचा प्रकार उदा. **(Secondary)/ (Higher Secondary)/ (Non Professional)/ (Professional)** यापैकी एक पर्याय (Dropdown) अचूक निवडावा.

३)प्रत्येक विद्यार्थ्याची माहिती स्वतंत्र भरावी व कॉपी पेस्ट करू नये.

ही यादी त्वरीत तयार कराव्यात व शासकीय वसतिगृह प्रवेशाच्या https://hmasscrutinyworkflow.mahait.org ऑनलाईन पोर्टलवर गृहपाल यांनी Login करुन पुढील ३ ते ४ दिवसामध्ये महाआयटीव्दारे सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर एका दिवसात याद्या

अपलोड करावयाच्या आहेत. यादी अपलोड करताना संगणकीय Excel Format मध्ये तसेच या याद्यांची गृहपाल यांच्या सही व शिक्क्यासह पीडीएफ फॉर्मेटमध्ये यादी अपलोड करावयाची आहे. वसतिगृहनिहाय या याद्या अपलोड न झाल्यास या वसतिगृहांच्या सन २०२४-२५ या वर्षाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पुर्ण होणार नाही तसेच सन २०२५-२६ ची प्रवेश प्रक्रीया सुरु होणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

तसेच १० जून २०२५ नंतर Send Back ची व्यवस्था ही बंद करण्यात येणार असुन Under Scrutiny, Send Back Application लवकरात लवकर अर्जदारांकडुन पुन:श्च अर्ज (Reapply) सादर करणेस सांगावे.१० जून २०२५ पुर्वी अर्जदार यांनी पुन:श्च अर्ज (Reapply) सादर केले नाहीत. असे अर्ज आपोआप प्रवेश प्रक्रीयेमधुन बाद (Discard) केले जातील.ही प्रक्रीया सन २०२५-२६ च्या प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक आहे. तसेच यादी पोर्टलवर अपलोड करणे व अर्जदार यांचेकडुन वरील प्रक्रीया करुन घेणेची जबाबदारी संबंधीत गृहपाल आणि संबंधीत सहाय्यक आयुक्त यांची राहील. याबाबत ऑनलाईन पोर्टलचे काम पाहणाऱ्या महाआयटीस स्वतंत्रपत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे. या संदर्भात क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या दिनांक २८.०५.२०२५ रोजीच्या तसेच पूर्वीच्या बैठकीत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तरी या पत्रात नमूद केल्यानुसार (१) सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची वसतिगृह प्रवेश प्रक्रीया सुरू करणेबाबत आणि (२) सन २०२४-२५ या वर्षातील वसतिगृहात प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमनिहाय वरील तक्त्यातील यादी पोर्टलवर अपलोड करण्याची अचूक कार्यवाही करावी. सदर सूचनांचे तातडीने पालन करावे.

(प्रमोद जाधव)
सहआयुक्त (शिक्षण)
समाज कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत: व्यवस्थापकीय संचालक, महाआयटी, महाआयटी कॉर्पोरेशन लिमिटेड, एपीजे हाऊस, चर्चगेट, मुंबई